## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्ती आदेश

जा.क्र सनिक/प्रलि/विकासेसहसंमसाय /कलम७७ (अ)/ ८८० /२०१६
कार्यालय, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. कन्नड, जि. औरंगाबाद
दि. १०/५/२०१६

**वाचा:-**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२)
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१४)
३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)

ज्याअर्थी, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. सायगव्हाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदींनुसार नोंदविली आहे. तिचा नोंदणी क्रमांक १४६ व दिनांक २६/९/१९६२ असा आहे. संस्थेने उक्त अधिनियम, नियम व तिच्या उपविधीतील शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या समितीची मुदत संपण्यापुर्वी तिची निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविणे, हे समितीचे कर्तव्य आहे. समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यात बुद्धीपुरस्सर कसुर केली असेल तेव्हा समितीचा पदावधी संपल्यानंतर तिचे सदस्य अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील आणि अशा परिस्थितीत निबंधक अधिनियममाच्या कलम ७७- अ अन्वये कार्यवाही करील.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१४) (ड) नुसार प्रत्येक संस्थेची समिती ही निवडणुका घेण्यासाठी मतदार यादी सुरळीतपणे तयार करण्याकरिता आवश्यक ती सर्व मदत, सहाय्य आणि माहिती पुरविल असे नमुद आहे. आपले संस्थेच्या समिती सदस्यांची मुदत दि. ०९/२/२०१६ रोजी संपुष्टात आली असल्याचे आज रोजी कार्यालयास निदर्शनास आलेले आहे. संस्थेच्या मतदानास पात्र सभासदांची प्रारूप मतदार यादी आज तारखेवर कार्यालयास अप्राप्त आहे.

त्याअर्थी, उक्त संस्थेच्या समितीचा पदावधी संपुष्टात आलेला असल्याने संस्थेची निवडणूक घेण्यास व समिती सदस्य निवडण्यात कसूर झाली आहे. म्हणून समिती सदस्यांवर त्वरित कार्यवाही करणे आवश्यक असल्याने त्यांना अशी नोटीस प्रसिद्ध करणे, वाजवी रित्या व्यवहार्य नाही, अशी माझी खात्री झाली आहे. सबब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(ब) मधील तरतुदीनुसार संस्थेची समिती मुदत संपली असल्याने संस्थेचे दैनंदिन कामकाज पार पाडण्यासाठी व निवडणूक प्रक्रिया पुर्ण करण्याकरिता संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक झाल्याने मी, पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

### -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१) (ब) आणि (फ) (दोन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी. डॉ. अं. आ. वाघमारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. कन्नड, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. सायगव्हाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद या संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी श्री डी. आर. बागल, भागचौकसनिस, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा- नागद, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. त्यांनी सदरील संस्थेचा पदभार घेवून तसा अहवाल सादर करावा. आणि, संस्थेची निवडणूक प्रकिया त्वरित सुरू करून दोन महिन्यांचे आत पुर्ण करावी.

सदरचे आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक. १०/०५/२०१६ रोजी पारीत करीत आहे.

10/5/16

**( डॉ. अं. आ. वाघमारे )**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, ता.कन्नड**